# ।। अथ बचन को अंग ।।

## मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ बचन को अंग लिखंते ।।

।। कवत ।।

बचना नाही मोल ।। तोल सो माप न आवे ।।
जो जाणे कोई बोल ।। ब्रम्ह के मांय मिलावे ।।
बायक बिष ऊतार ।। बचन सें सोदा कीजे ।।
बेटा बेटी ब्याव ।। परण घर भेळा लिजे ।।
बचना सूं अवतार ।। बफ धर राकस माऱ्या ।।
जन सुखिया मन सोच रे ।। बचन संत ऊधाऱ्या ।।१।।

वचन अनमोल आहे,त्याचे काही तोल मोल नाही.जर कोणी सतगुरुच्या ज्ञानाला पूर्ण जाणतो आहे तर त्या ज्ञानाला धारण करणाऱ्याला सतस्वरुप ब्रम्ह पदाची प्राप्ती होऊन जाते.वचनाने बोलून म्हणजे झाडा देऊन विष उतरवून देतात.कोणताही सौदा वचनाने होतो.वचनाने मुला–मुलींचा विवाह लग्न होते.वचनात बांधूनच अवतार येतात व राक्षसांना मारतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे मन,तू विचार कर,वचनानेच संत जीवाचा उध्दार करतात.।।१।।

बचना बंधे न्हार ।। बीर सो मूठ चळावे ।।
बचना के बस जरख ।। दोड़ म्हेरी पें आवे ।।
बचना तारा तोड़ ।। आण जमी पर मेले ।।
नाटक चेटक सीख ।। नटग्र बाजीग्र खेले ।।
बचना हारे जीत ।। बचन सूं मन उपाई ।।
बायक सूं सुखराम के ।। अटळ ध्रु बेठा जाई ।।२।।

सिंह ही वचनाने बंधनात येऊन जातो.वचनाने मूठ चालवतात वचनाच्या वश होऊन पळत स्त्रीजवळ येऊन जातो.वचनाने आकाशातील तारे तोडून जमिनीवर घेवून येतात. नाटक चेटक शिकून बाजीगर नट खेळ करतात.वचनाने हार जीत होते.मनातील विचार ही वचनाने प्रगट होतात.वचनाने बांधूनच धृव आकाशात अटळ बसला आहे. ।।२।।

हिये तराजु तोल ।। मोल कर बायर लावे ।।
गोतो कदे न खाय ।। बेण पाछो नही आवे ।।
प्रदेसाँ प्रभोम ।। ज्हाँ तहाँ सब ही माने ।।
भरी सभा के बिच ।। ताय की बात बखाणे ।।
मोलस तोलस नांय ।। बचन की कहाँ बडाई ।।
जन सुखिया मन सोच ।। बचन कहीये मुख लाई ।।३।।

आपल्या वचनांना ह्रदयाच्या तराजुत तोलून मग बोलायले पाहिजे.जो वचनांना तोलून

बोलतो,तो कधी गोता खात नाही,कारण की बोलले वचन परत येत नाही.चांगल्या वचनवाल्यांचे परदेशातील भूमीवर ही सर्व जागी गोष्ट मानतात आणि भर सभेत ही अशा व्यक्तीच्या वचनाची गोष्ट दृष्टांताच्या रुपात बखाण करतात व जे वचनांना तोलून मोलून बोलत नाही,त्यांच्या वचनांची कोणी बढाई करीत नाही,म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मनात विचार करुन मग मुखाने वचन काढायला पाहिजे.।।३।।

मंत्र के बस देव ।। सेव सूं आन मिले हे ।।
डाकण सरस सलेस ।। बिष बासक को जैहे ।।
न्हारी दे नित दुध ।। आय खुंटे से बंधे ।।
मंत्र के बस भूत ।। आण धोरा नित संधे ।।
पवन पाणी धरत्री ।। सब मंत्र बस होय ।।
तो हर मंतर सुखराम के ।। क्यूँ राम मिले नी तोय ।।४।।

मंत्रांच्या वशमध्ये देवता आहेत,ते सेवा केल्याने येऊन मिळतात.मंत्रांनीच डाकीण,सरस, सलेस व सापाचे विष उतरते.सिंहणी मंत्रांच्या वश होऊन खुंट्याला बांधली जाते व दुध देते.भूतही मंत्राच्या वश होऊन काम करायला लागून जातात.पवन,पाणी,धरती सर्व मंत्रांच्या वशमध्ये आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,परमात्मा नामच मंत्र आहे,तर त्याचा जप केल्याने रामजी कां मिळणार नाही?।।४।।

सो मण अन की प्रख ।। बानगी मांहि दिखावे ।।
अकल बुद्ध नर मांय ।। बचन अेकण मे पावे ।।
सस्तर कीसूं सुण मूठ ।। बाण अेकी जो छूटा ।।
सिध मंतर सुण जाप ।। जाब नेकी रिध खूटां ।।
युँ हरजन की पारखा ।। सबद एक के माँय ।।
अगम बात सुखराम के ।। आण पटके लाय ।।५।।

शेकडो मण अन्नाची परीक्षा नमुन्याने होते.मनुष्यात किती अक्कल व बुध्दी आहे त्याची परिक्षा एक वचन बोलण्यात होऊन जाते.तलवारीची परीक्षा मूठे ने होते.बाणाची परीक्षा एकच वेळा सोडल्याने होते.सिध्दची ही मंत्राच्या साधनेने सिध्दि होते.अशा सिध्दीने सिध्दाची परीक्षा होते.असेच संतांची परीक्षा वचनाने होऊन जाते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जे तीन लोकांच्या पलिकडील अगम देशाच्या पदाची गोष्ट सांगतात,ते सतस्वरुपी संत आहे.।।५।। ।। इति बचन को अंग संपूरण ।।